**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.1 राधेशाम हेमराज बुब यांचा शपथेवर पुढील सरतपास त्यांचे वकील श्री.आर.पी. भंडारी यांचेमार्फत :**

२. मी या प्रकरणात निशाणी क्र.०५ वर माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही देखील आहे. तसेच मी या प्रकरणात निशाणी क्र.०३ व नि.क्र.१८ सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

आता मला दि.०३/०२/२०२४ रोजीचा मुळ धनादेश दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही असून ती सही मी ओळखतो. त्यास **नि.क्र.२२** देण्यात आला. सदरचा धनादेश आम्ही वटण्याकामी कोटक महिंद्रा बॅक, शाखा–मेन ब्रॅच, अहमदनगर येथे जमा केला असता तो न वटता परत आला. त्याबाबतचा बॅकेचा दि.०५/०२/२०२४ रोजीचा मेमो मी या प्रकरणात दाखल केलेला आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येतो. सदरचा धनादेश न वटल्याकरणाने आम्ही आरोपीला आमच्या वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली होती. आता मला सदर नोटीसीची स्थळप्रत दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझे वकीलांची सही आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येतो. तसेच सदरची नोटीस पाठविल्याबाबतची पोस्टाची पावती मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येतो. आरोपीचा सदरची नोटीस मिळाल्याबाबतची ॲकनॉलेजमेंट रिसिट मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येतो. तसेच मी या प्रकरणात आरोपीचा आमच्या फर्ममध्ये असणारा खातेउतारा दि.१३/०४/२०२१ ते २२/०६/२०२३ पर्यंतचा दाखल केलेला आहे व त्यासोबत भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब अंतर्गत प्रमाणपत्र देखील मी दाखल केलेला आहे. त्यास एकत्रितरित्या **नि.क्र.२७** देण्यात आला.

सरतपास पुर्ण.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.12.22 15:37:35 +0530

**आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.व्ही.के. देशपांडे यांनी उलटतपासणीकामी पुढील तारीख मिळावी अशी तोंडी विनंती केली व त्यावर फिर्यादीच्या वकीलांनी त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे तोंडी कथन केले. सबब, आरोपीतर्फे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे त्यांचे वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.12.22 15:37:40 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.२२/१२/२०२५**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.